ePaper

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद : महाराष्ट्राला इंचभरही जमीन देणार नाही!



| वर्ष - 6 । अंक - 247 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- इंधन दरवाढः निषेधार्थ काँग्रेसचे आंदोलन!
- ग्रामपंचायत निवडणूक : भाजपची सरशी!
- भारतीय किसान संघाचा जीएसटी'विरोधात मोर्चा

www.mahaenews.com | बुधवार, 21 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पवनामाईच्या सन्मानाचा उत्सव!

## पवना थडी जत्रेला लाखो नागरिकांची भेट : महिला बचत गटांची कोट्यवधींची उलाढाल

**।पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शोभेच्या वस्तू, आधुनिक व पारंपारिक वस्त्र, महिलांची आभूषणे, लहान मुलांची खेळणी व फॅन्सी ड्रेस, पुस्तकांचे प्रदर्शन, गृहउपयोगी व चैनीच्या वस्तू, विविध मसाल्याचे पदार्थ व प्रकार खरेदीसाठी जनसागर लोटला होता. तर स्वादिष्ट व रुचकर खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी खवय्यांची गर्दी उसळलेली होती. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मेजवानीने रसिक मंत्रमुग्ध झाले होते, असे चित्र निर्माण झाले ते साप्ताहिक सुट्टीच्या निमित्ताने पवनाथडी जत्रेत.

महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्य विकसित व्हावे तसेच महिलांचे सबलीकरण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने दि.१६ डिसेंबर ते



दि.२० डिसेंबर २०२२ या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर पवनाथडी जत्रा भरवण्यात आली आहे. दरम्यान, साप्ताहिक सुट्टी व पवनाथडी जत्रा असा दुग्धशर्करा योग जुळून आल्यामुळे जत्रेचा आनंद घेण्यासाठी लोकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेली पवनाथडी जत्रा लोकांच्या कुतूहलाचा विषय ठरत असून पवनाथडी जत्रेची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. याठिकाणी उभारण्यात आलेली बहारदार स्वागत कमान, रचनात्मक स्टॉल्सच्या रांगा, आकर्षक विद्युत रोषणाई, तसेच पारंपारिक बैलगाडी व शेती साहित्य यांच्यासह पारदर्शक काचेवरील अधोगामी वाहणारा पाण्याचा सौम्य धबधबा लोकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. या ठिकाणी लोकांची सेल्फी काढण्यासाठी मोठी गर्दी होत आहे. तर गोंधळ, जागरण, लावणी अशा ग्रामीण लोककला प्रत्येक्ष अनुभवण्याची संधी लोकांना जत्रेच्या निमित्ताने उपलब्ध झाली आहे. आकाशी पाळणा, ड्रॅगन ट्रेन, झिग झॅग रोलर अशा अंगावर शहारे आणणाऱ्या अनेक खेळण्यांचा अनुभव घेताना लहान मुले, तरुण, ज्येष्ठ नागरिक मोठा जल्लोष करून जत्रेचा आनंद घेत आहेत. शुद्ध शाकाहारी, चमचमीत मांसाहारी खाद्यपदार्थांसह बहुविध खाद्यसंस्कृतीची मेजवानी एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने खवय्यांची इच्छापूर्ती होत आहे. महापालिकेच्या वतीने शहरात उभारण्यात आलेल्या प्रेक्षणीय,पर्यटन स्थळे, पायाभूत सुविधा याबाबत दृक श्राव्य चित्रफितींद्वारे माहिती देणारी डिजिटल चलचित्र भिंत उभारण्यात आली आहे. शिवाय, सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांची बैठक व्यवस्था असलेले सांस्कृतिक दालन उभारण्यात आले असून या ठिकाणी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. महाराष्ट्राची लोकधारा, खास महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर, मेकअप कौशल्य प्रात्याक्षिके व प्रशिक्षण, आर.डी बर्मन यांनी संगीत दिलेल्या सदाबहार गाण्यांचा कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे.

### महिला सबलीकरण आणि वंचितांना प्रोत्साहन...

**महिलांचे सबलीकरण करत असताना समाजाचा घटक असलेले दिव्यांग, तृतीयपंथी यांच्यासाठी देखील स्टॉल्स राखीव ठेवण्यात आले असून त्यांच्याद्वारे या ठिकाणी विविध वस्तू, खाद्यपदार्थांची विक्री करण्यात येत आहे. याद्वारे त्यांच्या सामाजिक व आर्थिक समावेशनासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. महापालिकेच्या वतीने १८ ते ३० वयोगटातील युवक व युवतींना रोजगारभिमुख कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या "लाईट हाउस" उपक्रमात युवक वर्गाने प्रवेश घ्यावा, त्याबाबत त्यांना माहिती व्हावी, यासाठी माहिती कक्ष उभारण्यात आला आहे. कौशल्य प्रशिक्षणाची नोंदणी करण्यासाठी युवक व युवतींचा अधिक कल असल्याचे दिसुन येत आहे. पवनाथडी जत्रेच्या ठिकाणी मोठ्या संख्येने महापालिकेचे कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे कर्मचारी, पोलीस दलाचे कर्मचारी यासह अग्निशामक बंब, सुसज्ज रुग्णवाहिका तैनाद करण्यात आली आहे, अशी माहिती समाज विकास अधिकारी सुहास बहाद्दरपुरे यांनी दिली.**

# जलपर्णी हटवण्यासाठी युवा सेना आक्रमक!

## रावेत बंधाऱ्यालगत जलपर्णीची समस्या : ... अन्यथा आंदोलनाचा इशारा

**।पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

रावेत बंधाऱ्यालगत मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढलेली आहे. या जलपर्णीमुळे पाणी प्रदूषण तसेच परिसरात दुर्गंधी पसरत आहे. नदीतील जलचर प्राणी आणि परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास ही जलपर्णी हानिकारक ठरत आहे. तरी बंधाऱ्या लगत वाढलेली जलपर्णी तात्काळ काढावी. अन्यथा युवसेनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

युवासेनेचे चिंचवड विधानसभा युवा उपअधिकारी सागर शिंदे यांनी यासंदर्भात पिंपरी चिंचवड महापालिकेचे आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांना निवेदन दिले आहे. यावेळी पुणे जिल्हा युवासेना प्रमुख सचिन सानप, पिंपरी चिंचवड शहर प्रमुख युवासेना अजिंक्य उबाळे, उपजिल्हा प्रमुख युवासेना अमित शिंदे, शाखा अधिकारी कुणाल दर्शिले उपस्थित होते.



युवासेनेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहराला पाणी पुरवठा केल्या जाणाऱ्या पवना नदी पात्रातील रावेत येथील बंधाऱ्या लगत मागील काही दिवसापासून जलपर्णी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे बंधाऱ्यातील असणारे पाणी सुद्धा दृष्टीस पडत नाही. एवढेच नाही तर पवना नदीपात्रातील जाधव घाट परिसर, केजुबाई बंधारा आदी ठिकाणासह पवना नदीपात्रात सर्वत्र जलपर्णीचा विळखा अधिक घट्ट झालेला पहावयास मिळत आहे. त्याच बरोबर जलपर्णीमुळे पाणी प्रदूषण तसेच परिसरात दुर्गंधी पसरत आहे.

### महापालिका आरोग्य विभागाकडे तक्रार...

**याबाबत आरोग्य विभागाकडे विचारणा केली असता आरोग्य विभाग हे पाहणे आमचे काम नाही असे बेजबाबदार वक्तव्य करत आहे. दिवसेंदिवस जलपर्णी फोफावणे ही बाब गंभीर असून जलचर प्राणी आणि नागरिकांच्या आरोग्यास हानिकारक आहे. बंधाऱ्या लगत वाढलेली जलपर्णी तात्काळ काढावी व भविष्यात जलपर्णी वाढणार नाही यासाठी जलपर्णीचे काढण्याचे काम ज्या ठेकेदारस दिले आहे त्याचीही चौकशी करून योग्य ती कारवाई व्हावी, तसेच त्याचे बिल अदा करू नये. याबाबत योग्य ती उपाययोजना करावी अन्यथा युवासेना या प्रकाराविरोधात आंदोलन करेल असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.**

# इंधन दरवाढ: निषेधार्थ काँग्रेसचे आंदोलन!

## काँग्रेसचे नेते मोहन जोशी, माजी शहराध्यक्ष रमेश बागवे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

पुणे
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

सातत्याने होत असलेल्या इंधन दरवाढीच्या निषेधार्थ काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले. हातगाडीवर पेट्रोल डिझेलचे बॅरेल ठेवून गेल्या सहा महिन्यात झालेल्या इंधन वाढीचे दरपत्रक तयार करून इंधन दरवाढीचा निषेध करण्यात आला. हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन पुणे मुख्य कार्यालयासमोर यावेळी घोषणाबाजी करण्यात आली. काँग्रेसचे माजी आमदार मोहन जोशी आणि




माजी शहराध्यक्ष रमेश बागवे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले. काँग्रेसच्या शिष्टमंडळाने हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशनचे मुख्य व्यवस्थापक मनीष अग्रवाल यांना निवेदन दिले. माजी नगरसेवक वींद्र धंगेकर, अविनाश बागवे, नरुद्दीन सोमजी, रमेश अय्यर, प्रशांत सुरसे, शेखर कपोते, शाबिर खान, चेतन आगरवाल, मंजूर शेख, शिलार रतनगिरी, स्वाती शिंदे, कान्होजी जेधे यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. सहा महिन्यापूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे भाव १२९ डॉलर प्रति बॅरल होते. त्यावेळी पेट्रोल आणि डिझेलचे दर प्रति लिटर शंभर रुपयापेक्षा अधिक होते. आज आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर प्रति बॅलर ७६ डॉलर ते ८० डॉलरच्या दरम्यान आहे. मात्र पेट्रोलचा दर १०६ रुपये तर डिझेलचा भाव ९४ रुपये प्रतिलिटर आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेची पिळवणूक होत आहे. केंद्र सरकारने जनतेच्या हिताकरिता त्वरित पेट्रोल आणि डिझेलचे दर ७० रुपये प्रति लिटर करावे, अन्यथा काँग्रेसच्या वतीने संपूर्ण शहरभर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे मोहन जोशी यांनी सांगितले.

रमेश बागवे म्हणाले की, इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंचे चे भाव वाढले आहे. एकीकडे इंधन निर्यात करून तेल कंपनी आणि सरकार मोठ्या प्रमाणावर नफा मिळवत आहे आणि दुसरीकडे कच्च्या तेलाचे भाव कमी असताना सुद्धा ग्राहकांना जास्तीच्या दराने इंधन देत आहे हे अन्याकारक आहे.

# सेक्स रॅकेट चालवणाऱ्या कल्याणी देशपांडेला ७ वर्षांची सक्तमजुरी

## 10 लाख रुपयांचा दंड न भरल्यास 1 वर्षांची अतिरिक्त शिक्षा भोगावी लागणार

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे । कल्याणी देशपांडे १९९८ पासून बेकायदा व्यवसायात सक्रिय आहे. अनेक गुन्हेगारांसोबत तिचे संबंध होते. शहरात संघटितपणे वेश्या व्यवसाय केल्याचा कल्याणीवर आरोप होता. कल्याणी विरोधात चतुःश्रृंगी, कोथरुड, विश्रांतवाडी, हिंजवाडी येथील पोलीस ठाण्यात २० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे तिच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती.

पुणेः गेली २४ वर्षे संघटीत गुन्हेगारीत सक्रीय असलेल्या कुख्यात कल्याणी देशपांडेला विशेष न्यायालयाने हायप्रोफाइल सेक्स रॅकेटप्रकरणी ७ वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा व १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास १ वर्षांची अतिरिक्त शिक्षा कल्याणी देशपांडेला भोगावी लागणार आहे.

कल्याणी देशपांडे १९९८ पासून बेकायदा व्यवसायात सक्रिय आहे. अनेक गुन्हेगारांसोबत तिचे संबंध होते. शहरात संघटितपणे वेश्या व्यवसाय केल्याचा कल्याणीवर आरोप होता. कल्याणी विरोधात चतुःश्रृंगी, कोथरुड, विश्रांतवाडी, हिंजवाडी येथील पोलीस ठाण्यात २० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे तिच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती.

पुण्यातील कोथरुड भागात एका हायप्रोफाईल सोसायटीत सेक्स रॅकेट सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तपास केला व तेथे छापा टाकला. तेथे काहीजणांना अटक करण्यात आली. त्यानंतर याप्रकरणी पोलिसांनी ऑगस्ट २०१६ मध्ये कल्याणीला अटक केली. तिच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर तिच्यावर सेक्स रॅकेट चालवल्याप्रकरणी आरोप निश्चित करण्यात आले. ते आरोप तिने फेटाळले. त्यामुळे तिच्याविरोधात खटला चालवण्यात आला.



**मात्र आपल्याविरोधात सरकारी पक्ष ठोस पुरावे सादर करु शकलेला नाही. त्यामुळे या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करावी, अशी मागणी कल्याणीच्यावतीने करण्यात आली होती. ती मागणी न्यायालयाने फेटाळून लावली. तसेच सरकारी पक्षाची मागणी मान्य करत न्यायालयाने कल्याणीला सात वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. कल्याणीसह न्यायालयाने प्रदीप गवळीलाही ७ वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.**

विशेष सरकारी वकील विजय फरगडे यांनी कल्याणीला जास्तीत जास्त शिक्षा ठोठावण्याची मागणी केली. कल्याणीचा गुन्हा गंभीर आहे. सभ्य समाजासाठी तिचे कृत्य धोकादायक आहे. असा गुन्हा करण्याचे धाडस कोणी करु नये, यासाठी कल्याणीला अधिकाधिक वर्षाची शिक्षा ठोठवावी, अशी मागणी ॲड. फरगडे यांनी केली.

### स्वारगेट आणि डेक्कनवरून

# हडपसर टर्मिनलसाठी पीएमपीएलची सेवा सुरू

। पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

शहरातून हडपसररेल्वे टर्मिनल येथे जाण्यासाठी स्वारगेट आणि डेक्कन येथून पीएमपी बस सोडण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या बससेवेमुळे हडपसररेल्वे स्टेशनला जाणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. यामुळे रिक्षा चालकांकडून होणारी लूट थांबणार आहे. हडपसर टर्मिनलवर सध्या केवळ हडपसर-हैदराबाद ही एकमेव रेल्वे सुरू आहे. ही रेल्वे मंगळवार, शुक्रवार आणि रविवार या तीन दिवशी दुपारी साडेतीनच्या सुमारास सुटते. याच दिवशी हैदराबाद येथून सकाळी १० वाजून ५० मिनिटांनी हडपसर येथे येते. प्रवाशांच्या सोयीसाठी या तीन दिवशी स्वारगेट आणि डेक्कन येथून बस सोडण्यात येणार आहे. रेल्वे स्टेशन परिसरातील रस्ता अरुंद असल्याने मिडी बस सोडण्यात येणार आहे.

सकाळी ११ वाजता हडपसर येथून या दोन्ही बस सुटतील. स्वारगेटला १२ वाजता तर डेक्कन येथे सव्वाबाराच्या सुमारास या बस पोहोचतील, तसेच स्वारगेट येथून दुपारी २ वाजता बस सुटेल, तर डेक्कनहून दुपारी १ वाजून ५५ मिनिटांनी पीएमपी सुटेल. हडपसर येथे दुपारी तीनच्या सुमारास या बस पोहोचतील, अशी माहिती पीएमपी प्रशासनातर्फे देण्यात आली.



# मावळ मतदार संघातील रेल्वे प्रश्नांना गती!

## खासदार बारणे यांचा पाठपुरावा : रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची आढावा बैठक

**पिंपरी-चिंचवड । । महाईन्यूज ।**

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोणावळा-पुणे-लोणावळा लोकल सेवा दिवसभर धावणे, सिंहगड एक्सप्रेसच्या कोचमध्ये वाढ करण्यासह रेल्वेसंदर्भातील विविध प्रश्नांबाबत उठविलेल्या आवाजाची रेल्वेमंत्र्यांनी दखल घेतली. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज (मंगळवारी) खासदार बारणे यांना बोलावून घेत प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेतला.



> **“देखभालीच्या कामासाठी काही वेळ रेल्वे सेवा बंद केली जाते. त्याच्या वेळेबाबत नागरिकांच्या काही मागण्या आहेत. त्याचाही विचार करावा. पुणे-लोणावळा दरम्यान दुपारच्या वेळेतही लोकल धावावी. त्यामुळे विद्यार्थी, कामगारांचे हाल होणार नाहीत. सिंहगड एक्सप्रेसच्या बदललेल्या बोगी व्यवस्थेमुळे सीटांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे सकाळी पुण्याहून मुंबईला जाणा-या नागरिकांचे हाल होत आहेत. त्यासाठी एक्सप्रेसचे दोन कोच वाढविण्यात यावेत. कर्जत-पनवेल लोकल रेल्वे मार्गाच्या कामाला गती द्यावी. पनवेल, उरण पर्यंतची रेल्वेची कामे जलगतीने करावीत. पनवेल हद्दीतील रेल्वे स्थानकांवर सोयी-सुविधा द्याव्यात”, अशी मागणी रेल्वे मंत्र्यांकडे केली आहे.**
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार, मावळ.**

पुणे-लोणावळा लोकल दिवसभर धावणे, घाट भागात नवीन तंत्रज्ञान वापरुन बदल करणे, कर्जत-पनवेल लोकल रेल्वे मार्गाच्या कामाला गती दिली जाईल, अशी हमी रेल्वेमंत्री वैष्णव यांनी दिली. त्यामुळे मावळातील प्रलंबित असलेल्या रेल्वेच्या कामांना गती मिळेल असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला. संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात खासदार बारणे यांनी मतदारसंघातील रेल्वे प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले होते. त्याची तत्काळ दखल रेल्वेमंत्री वैष्णव यांनी घेतली. प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेवून कामे तत्काळ मार्गी लावण्याची ग्वाही दिली.

रेल्वे मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीची माहिती देताना खासदार बारणे म्हणाले, ”सिंहगड एक्सप्रेसचे कोच वाढवावेत. पुणे-लोणावळा दरम्यान लोकल रेल्वे दिवसभर धावावी. लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना लोणावळा, कर्जत स्थानकावर थांबा मिळावा. मावळ लोकसभा मतदारसंघात सुरु असलेली रेल्वे अंडरपास, ओव्हर ब्रीज, नेरळ रेल्वे स्टेशनच्या कामाला गती द्यावी याबाबत विविध संसदीय आयुधांचा वापर करत सभागृहात आवाज उठविला. रेल्वेचे स्थानिक अधिकारी लोकप्रतिनिधींच्या तक्रारींकडे, प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याकडे रेल्वे मंत्र्यांचे लक्ष वेधले होते”.

त्याअनुषंगाने रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी बोलावून घेत मावळ मतदारसंघातील रेल्वेच्या प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली. पुणे विभागाच्या तत्कालीन विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) रेणु शर्मा यांच्या कार्यकाळात रेल्वेची कामे अतिशय संथगतीने सुरु होती. तक्रारींवर त्या व्यवस्थित उत्तरे देत नव्हत्या, उद्धटपणे बोलत होत्या, अशी तक्रार खासदार बारणे यांनी केली. त्यावर रेल्वेमंत्री वैष्णव म्हणाले, शर्मा यांची बदली केली आहे. तरी, देखील तुमच्या तक्रारीची शर्मा यांच्या सेवा पुस्तकात नोंद करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

”कर्जत वरुन लोणावळ्याकडे येताना रेल्वेला नवीन इंजिन लावले जाते. त्यात वेळ जातो. त्याबाबत नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. नव्याने डीपीआर तयार करावा. पुणे-लोणावळा घाट भागात काही बदल करता येतील का, त्यासाठी जलद गतीचे नवीन मार्ग तयार करता येईल का, यासंदर्भात पडताळणी करावी. नवीन मार्ग तयार झाला. तर, वेगात रेल्वे धावतील”, अशा विविध मागण्या खासदार बारणे यांनी केल्या.

### कर्जत-पनवेल लोकल रेल्वे मार्गासह सर्व कामांना गती दिली जाईल – रेल्वेमंत्री

**त्यावर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, ”पुणे-लोणावळा दरम्यान दुपारच्या वेळेतही लोकल रेल्वे धावली जाईल. सिंहगड एक्सप्रेसच्या कोचमध्ये वाढ केली जाईल. कर्जत-पनवेल लोकल रेल्वे मार्गाच्या कामाला गती दिली जाईल. पनवेल, उरण पर्यंतची रेल्वेची कामे प्रगतीपथावर असून जलगतीने करण्यावर भर दिला जाईल. पनवेल हद्दीतील रेल्वे स्थानकांवर सिडकोच्या मदतीने सोयी-सुविधा देण्याबाबत प्रयत्न केले जातील. पुणे-लोणावळा घाट भागात जलदगतीने मार्ग करण्यासाठीचा डीपीआर तयार केला जाईल. त्याकरिता एजन्सी नेमण्यात येईल. याबाबत मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अशोक कुमार मिश्र यांना सूचना दिल्या जातील”.**

---

# नवी सांगवीमध्ये अटल महाआरोग्य शिबिर

## रुग्णांचे मोफत उपचार : भाजपाचे शंकर जगताप यांचा पुढाकार

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी: महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, प्रतिभा महिला प्रतिष्ठान, चंद्रंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि आमदार लक्ष्मण जगताप यांच्या संयुक्त विद्यमाने नवी सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानात अटल महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. २४ आणि २५ डिसेंबर असे दोन दिवस सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत हे विनामूल्य अटल महाआरोग्य शिबीर होणार आहे. या शिबीरासाठी ऑनलाइन नाव नोंदणीला सुरूवात झाली असून, गरजू रुग्णांना क्यूआर कोड, वेबसाइट तसेच मोबाईलवर फोन करूनही आपली नाव नोंदणी करता येणार आहे.



या शिबीरात सर्व आजारांच्या तपासण्या, मार्गदर्शन, उपचार आणि शस्त्रक्रिया मोफत होणार आहेत. शिबीरात मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नामांकित रुग्णालये सहभागी होणार आहेत. तसेच तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची मोफत तपासणी करणार असून, शस्त्रक्रियाही मोफत केली जाणार आहे.

**शिबीरासाठी रुग्णांना HTTPS://HEALTHCAMP.SITE या वेबसाईटवर ऑनलाइन नाव नोंदणी करता येईल. याशिवाय नाव नोंदणीसाठी 7507411111 किंवा 7575981111 या मोबाईल क्रमांकावरही संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. हे शिबीर केवळ तपासणी करण्याकरीताचे शिबीर नसून रुग्णाला बरा होईपर्यंत उपचार करण्यात येणार असल्याचे शिबीराचे आयोजक तसेच भाजपचे चिंचवडे विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी सांगितले. या शिबीराचा जास्तीत जास्त रुग्णांनी व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.**

---

# उच्च शिक्षणाच्या आठ सीईटींचा अभ्यासक्रम जाहीर



**पुणे।** उच्च शिक्षण संचालनालयाने २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारितील आठ अभ्यासक्रमांच्या सामायिक प्रवेश परीक्षेचा (सीईटी) अभ्यासक्रम जाहीर केला. त्यानुसार विधीसाठी १५०, बीएड-एमएड आणि बीपीएड-एमपीएडसाठी १०० गुणांची परीक्षा होणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी दरवर्षी सीईटी घेण्यात येते. तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या सीईटी परीक्षांचा अभ्यासक्रम आणि गुणांचे निकष नुकतेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (सीईटी सेल) जाहीर करण्यात आले. त्यानंतर आता उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील सीईटींचा अभ्यासक्रम संचालक डॉ. शैलेश देवळाणकर यांनी जाहीर केला. आठ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी गुण आणि निकष जाहीर केल्यामुळे विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना दिशा मिळणार आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाने जाहीर केलेल्या निकषांनुसार, विधी तीन आणि पाच वर्षे अभ्यासक्रमांची १५० गुणांची सीईटी परीक्षा होईल. त्यासाठी विषय समान असले तरी गुणभार स्वतंत्र असेल. बीपीएड आणि एमपीएडसाठी ५० गुणांची लेखी, ५० गुणांची शारीरिक चाचणी अशी १०० गुणांची परीक्षा होणार आहे.

## संपादकीय »

# नाकाखालून आले आणि तिखट झाले

***कानामागून आले आणि तिखट झाले, अशी आजवर प्रचलित असलेली म्हण राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यानंतर बदलून घ्यावी लागेल असे वाटते. त्यांनी महाविकास आघाडीने शनिवारी मुंबईत आयोजित केलेल्या महामोर्चाला नॅनो मोर्चा संबोधून त्यांच्या नाकाखालून आम्ही सरकार पळवून आणले आणि आम्ही सरकार बनवले ते त्यांना कळलेदेखील नाही, हे काय आमचे सरकार अस्थिर करणार, असा टोला लगावला.***

मी पुन्हा येईन, या भाजपच्या आशावादाला २०१९च्या विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांनी सुरुंग लावल्यामुळे भाजपचे केंद्र आणि राज्यातील नेते त्यांच्यावर चवताळलेले होते. त्यातून त्यांनी अडीच वर्षे नव्याने सत्तेत आलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या मागे केंद्रीय यंत्रणांच्या माध्यमातून चौकशीचा ससेमिरा लावला. त्यात शिवसेनेच्या नेत्यांना विशेष लक्ष्य करण्यात आले होते. शेवटी शिवसेनेत नाराज असलेल्या एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबतच्या ४० आमदारांना बाहेर पडण्याचा मार्ग भाजपने दाखवला. त्यानंतर त्यांच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीसांनी राज्यात भाजपची सत्ता आणली. यावेळी भाजपची हातातोंडाशी आलेली सत्ता पुन्हा राज्यात आणणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपद पुन्हा दिले जाईल, असे वाटत असताना केंद्रीय नेतृत्वाकडून मुख्यमंत्रीपदाची माळ एकनाथ शिंदे यांच्या गळ्यात घालण्यात आली. त्यावेळी अर्थातच देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे नेते नाराज झाले. पुढे भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी काळजावर दगड ठेवून एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद द्यावे लागले, अशा एकूणच राज्यातील भाजपच्या नेत्यांच्या भावना बोलून दाखवल्या होत्या.

सध्या राज्यात जे सरकार आहे ते फडणवीस-शिंदे सरकार आहे, त्याला भाजपचे सरकार असे संबोधले जात नाही. कारण भाजपने मोठ्या मनाने शिंदे यांना मुख्यमंत्रीपद दिले असले तरी शिंदे यांचा वेगळा गट कायम आहे. तो त्यांनी भाजपमध्ये विलीन केलेला नाही. त्यामुळे भाजपला या गोष्टीचे कायम टेन्शन राहणार आहे, पण आपण उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना कमकुवत केली याचा भाजपला आनंद आहे. दुसऱ्या बाजूला शिंदे यांनी केलेल्या बंडाचा मोठा धक्का उद्धव ठाकरे आणि त्यांच्या निकटवर्तीयांना बसला आहे. कारण आजवर शिवसेनेमध्ये बरेच वेळा बंड झाले, पण त्यावेळी ते बंड करणारे शिवसेनेतून बाहेर पडले, पण यावेळी एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडाचे स्वरूप वेगळे होते.



## आनंदी सकाळ

# भगवंताचे अनुसंधान पोथ्यांचे सार

देह म्हटला की हृदय आणि इतर अवयव हे त्याचे भाग होत, पण समजा, देहाचे इतर अवयव शाबूत आहेत आणि हृदय तेवढे बंद पडले, तर सर्व इंद्रिये शाबूत असूनही त्यांचा उपयोग नाही. याउलट हृदय चालू असून इतर अवयव जरी काम करायला समर्थ नसले, तरी उपचार करून पुनः पूर्ववत व्यवहार चालू होण्याचा संभव असतो. फार काय, पण एखादा अवयव काढून टाकावा लागला तरी, हृदय शाबूत असेल तर काम भागते. पण जर का हृदयच बंद पडले, तर मात्र सर्व काही संपलेच. नाम हे हृदयासारखे आहे. इतर साधने ही बाकीच्या अवयवांसारखी आहेत. म्हणून नाम नसेल तर इतर साधने फलदायी होऊ शकणार नाहीत.'आता या जन्मात एवढे पुरे' हा न्याय फक्त भगवंताच्या स्मरणाला तुम्ही लागू करता, पण पैसे मिळविण्यासाठी किंवा विषय भोगण्याला मात्र तो लागू करीत नाही! याचे कारण, भगवंताचे स्मरण केले नाही तरी चालते असे वाटते. प्रपंचात जिला प्रीती असे म्हणतात ती भगवंताकडे लागली की भक्ती बनते; प्रपंचातला लोभ भगवंताची आवड बनते. अशा रीतीने आपले विकार भगवंताकडे लावता येतात.

# हॅकर्सना आरोग्यात स्वारस्य का?




'ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, दिल्ली' अर्थात एम्सच्या जवळपास सर्व डिजिटल सुविधा नुकत्याच एका सायबर हल्ल्यात हॅक झाल्या. यात रुग्णांच्या आरोग्याचे विविध अहवाल आणि नवीन माहितीची नोंदणी करण्याच्या सर्व डिजिटल मार्गांचा समावेश होता. ज्या अज्ञात सायबर हल्लेखोरांनी हे केले त्यांनी जवळपास २०० कोटी रुपयांची खंडणी देखील मागितली. ही खंडणी क्रिप्टोकरन्सीतून हवी आहे, असेदेखील नमूद केले. अशा प्रकारच्या हल्ल्यांना 'रॅन्समवेअर' म्हटले जाते. कारण यात 'रॅन्सम' म्हणजेच खंडणी मागितली जाते.



डिजिटल स्वरूपात असलेली माहिती आणि डिजिटल आरोग्य सुविधांच्या उपयोगाचे मार्ग हे कूटशास्त्राद्वारे (क्रिप्टोग्राफी) 'एनक्रिप्ट' केले जातात. त्यांना 'डिक्रीप्ट' करायची किल्ली या सायबर हल्लेखोरांकडे असते. गेल्या वर्षी सीएनए फायनान्शियल या विमा कंपनीवर हल्लेखोरांनी सायबरहल्ला केला तेव्हा या कंपनीने तब्बल ३२९ कोटी रुपयांची खंडणी भरली. विमा कंपनी ही मुख्यत्वे माहितीवरच चालते, जी आज जवळपास पूर्णपणे डिजिटल स्वरूपातच असते. यावरून अशा हल्ल्यांचा किती गंभीर परिणाम होऊ शकतो, याचा अंदाज येतो. पण सायबर हल्ल्यांसाठी इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा आरोग्य क्षेत्र दिवसेंदिवस सर्वाधिक आकर्षक ठरत आहे, असे का? एका अहवालानुसार २०२१ मध्ये २०१८ च्या तुलनेत तिप्पटीच्या वर सायबर हल्ले झाले आणि २०२२ मध्येदेखील ही वाढ पाहायला मिळत आहे. या हल्लेखोरांना खंडणीपलीकडेही काही आकर्षण असते का?

इंटरनेटच्या जगतात तुमची ओळख चोरून, तुमच्या ओळखीचे सोंग घेऊन चुकीची कामे करण्यासाठी अनेक हॅकर मंडळी वाटच पाहत असतात. त्यासाठी आरोग्य अहवाल हा एक उत्तम पर्याय असतो. महत्त्वाच्या किंवा प्रसिद्ध व्यक्तींच्या आरोग्याविषयीची संवेदनशील माहिती वापरून खंडणी मागणे किंवा त्रास देणे हे प्रकार घडू शकतात. एका सर्वेक्षणानुसार डिजिटल काळ्या बाजारात (त्यास 'डार्क वेब' असेदेखील संबोधले जाते) आरोग्याच्या नोंदी इतर कोणत्याही माहितीपेक्षा सर्वात महाग विकल्या जातात. म्हणून एम्स प्रकरणासारख्या बातम्या वारंवार वाचायला मिळतात.स्वत:च्या आरोग्याची संपूर्ण माहिती आपण एखाद्या फाइलमध्ये नीट सांभाळून ठेवतो. बहुतेकदा रोगाचे अचूक निदान करण्यासाठी डॉक्टरांना अधिकाधिक माहिती देणे उपयुक्त ठरते. कधी काही जुने अहवाल किंवा जुन्या औषधांची यादी आपल्याकडून हरवली तर? किंवा आपण अन्य ठिकाणी असताना स्वत:च्या आरोग्याची कोणतीच माहिती सोबत नसेल आणि आपल्याला डॉक्टरकडे जायचे असेल, तर सर्व तपासण्या परत करायच्या का?

# मोबाईलचा नाद खुळा!

**विद्यार्थ्यांमध्ये मोबाईलची सवय इतकी रूजली आहे की त्याशिवाय जणू त्यांचा अभ्यासच होणार नाही. कोरोना काळातील सवयीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या संपादनावर होत आहे. येत्या काही काळात शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवरदेखील परिणाम झालेला अनुभवास येईल.**

गेल्या काही महिन्यांत मुलांमध्ये हिंसा वाढत असल्याची वृत्ते प्रसारमाध्यमांतून समोर येत आहेत. तीव्र स्वरूपाच्या हिंसक घटना, हत्या, बलात्कार अशा घटनांमध्ये शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग स्पष्ट होत आहे. शाळा स्तरावर शिक्षकांशी बोलल्यानंतर विद्यार्थ्यांची एकाग्रता कमी होत असल्याचे सांगण्यात येत आहे. विद्यार्थ्यांची अभ्यासाची सवय कमी झाली आहे. विचार करून वर्तन करण्यापेक्षा आणि पुस्तकात रमण्यापेक्षा विद्यार्थी दूरदर्शन, मोबाईलमध्ये अधिक रमत आहेत. वाढत्या स्क्रिन टाईममुळे विद्यार्थ्यांच्या मनातील हिंसेची पातळी उंचावत आहे. इतक्या लहान वयात विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेली हिंसेची भावना चिंताजनक आहे.

त्यामुळे याबाबत विचार करण्याची वेळ आली आहे. कोरोनाच्या



कालखंडात शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या हाती मोबाईल, टॅब देण्यात आले. घरात बसून राहावे लागत असल्याने पालकांसोबत मुलेही दूरदर्शनच्या कार्यक्रमात वेळ घालवत होती. इतर वेळी असलेल्या वेळेपेक्षा अधिक वेळ मुले दूरदर्शन, मोबाईलच्या समोर होती. हाती आलेल्या मोबाईलचा उपयोग करण्यास मुले चांगली सरावली होती. अभ्यासाबरोबर यू ट्यूब तसेच विविध संकेतस्थळे विद्यार्थी सहजतेने हाताळत होती. पालकांनी विद्यार्थ्यांच्या हाती शिक्षणासाठी आंतरजालाशी जोडणी करत मोबाईल दिल्याने मुले त्याचा पुरेपूर उपयोग करत होती.

विद्यार्थ्यांच्या भविष्याची काळजी म्हणून मोबाईल हाती देण्यात आला होता, मात्र आता प्रत्यक्षात शाळा सुरू झालेल्या आहेत, मात्र त्या काळात मोबाईल तत्सम साहित्यासाठीच्या वेळेची सवय फारशा वेगाने कमी होताना दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वयाचा विचार करता कोरोनाच्या काळात कितीतरी पट अधिक वेळ विद्यार्थी स्क्रिन टाईमसमोर होती. शाळा सुरू झाल्याने काही प्रमाणात वेळ कमी झाला असला तरी पुरेशा प्रमाणात विद्यार्थी स्क्रिन टाईमपासून दूर गेलेले नाहीत. विद्यार्थ्यांमध्ये मोबाईलची सवय इतकी रूजली आहे की त्याशिवाय जणू त्यांचा अभ्यासच होणार नाही. कोरोना काळातील सवयीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या संपादनावर होत आहे. येत्या काही काळात शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवरदेखील परिणाम झालेला अनुभवास येईल.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ग्रामपंचायत निवडणूक : भाजपची सरशी!

## गावकारभारी जोरात : बाळासाहेबांची शिवसेनेलाही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद



। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील साडेसात हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा निकाल आज समोर आला आहे. ही निवडणूक शिंदे-फडणवीस सरकार आणि महाविकास आघाडीसाठी फार महत्त्वाची होती. परंतु निवडणुकीचे निकाल समोर आल्यानंतर राज्यातील जनतेने सर्वाधिक पाठिंबा भाजपला दिल्याचं दिसून आलं आहे. विदर्भ, कोकण, मराठवाडा, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रात भाजपने सरशी केली आहे. तर बाळासाहेबांची शिवसेनेलाही जनतेने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत दणदणीत विजय मिळवून दिला आहे.

### 7751 पैकी 7545 ग्रामपंचायतींचा निकाल समोर

1) भाजप – 2309
2) राष्ट्रवादी कॉंग्रेस – 1509
3) इतर – 1263
4) कॉंग्रेस – 961
5) शिंदे गट – 800
6) ठाकरे गट – 703

### मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात भाजपचे वर्चस्व

ठाणे जिल्ह्यातील थेट सरपंच पदासाठी 34 ग्रामपंचायतीमध्ये 114 उमेदवारांसह 219 सदस्यांच्या जागांसाठी 613 उमेदवारांच्या अंतिम निकालात भाजपाचे वर्चस्व राहिले आहे. 20 ठिकाणी भाजपाचे पॅनल निवडून आले आहे.

### विदर्भ, कोकण सगळीकडे आमची सरसी : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ग्रामपंचायत निवडणुकीच्या निकालांवर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, आमच्या युतीला दणदणीत विजय मिळाला आहे. राज्यात 3 हजार 29 ग्रामपंचायती आमच्या आल्यात आहेत. विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आमची सरसी झाली आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### लातूर ग्रामपंचायत निवडणुकीत भाजप

बिनविरोध: 16 सर्वपक्षीय: भाजप -153, कॉंग्रेस -73, राष्ट्रवादी – 42
ठाकरे गट – 16, शिंदे गट – 03, मनसे – 03, इतर – 42,
सरपंच पद रिक्त – 03

### अहमदनगर : एकूण ग्रामपंचायत – 203

बिनविरोध : 13 भाजप – 74, राष्ट्रवादी – 68, कॉंग्रेस – 27,
ठाकरे गट – 19, शिंदे गट – 1, इतर – 14

### पुणे जिल्ह्याचा निकाल - 221

भाजप – 33, राष्ट्रवादी – 105, कॉंग्रेस – 44, ठाकरे गट – 15, शिंदे गट – 15

### वर्धा जिल्ह्याचा निकाल – 113

भाजप – 51, राष्ट्रवादी – 03, कॉंग्रेस – 40, ठाकरे गट – 01

### धुळे जिल्ह्याचा निकाल – 128

भाजप – 52 , राष्ट्रवादी – 03, कॉंग्रेस – 29 ठाकरे गट – 07, शिंदे गट – 31

### जळगाव जिल्ह्याचा निकाल – 140

भाजप – 43 , राष्ट्रवादी – 32, कॉंग्रेस – 16, ठाकरे गट – 13, शिंदे गट – 27

### रत्नागिरी जिल्ह्याचा निकाल – 222

ठाकरे गट – 101, शिंदे गट – 45, भाजप – 17 , राष्ट्रवादी – 08, कॉंग्रेस – 03,

### सिंधुदुर्ग जिल्ह्याचा निकाल – 325

भाजप – 182, ठाकरे गट -76, शिंदे गट – 24, राष्ट्रवादी – 01

---


# “फडणवीसांनी दत्तक घेतलेल्या गावात राष्ट्रवादीचा दलबदलुंचं राजकारण : ” जयंत पाटलांची टीका!

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील एकूण ७ हजार ७८२ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा आज निकाल जाहीर होत आहे. थेट सरपंच निवडून देण्याच्या नव्या नियमांनुसार पार पडलेल्या निवडणुकींचा निकाल जाहीर होत असताना, यामध्ये महाविकास आघाडीतील घटक पक्ष बाजी मारतात की सत्ताधारी शिंदे गट आणि भारतीय जनता पार्टी सर्वाधिक जागा जिंकते याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलेलं आहे.

दरम्यान, आतापर्यंत दोन्ही बाजूंनी सर्वाधिक जागा आम्हीच जिंकल्या असल्याचा दावा केल्याचं समोर आलं आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. जयंत पाटील म्हणाले, “महाराष्ट्रात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिथे गड आहे तिथे राष्ट्रवादी कॉंग्रेस, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे जिथे गड आहेत तिथे त्यांचे उमेदवार आणि कॉंग्रेसचे गड आहेत, तिथे कॉंग्रेसेचे उमेदवार निवडून आले आहेत. महाराष्ट्रातील आकडेवारी जर आपण पाहिली, तर अधिकृत घोषित झालेल्या निकालात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा जवळपास १३०० ग्रामपंचायतींवर निवडून आलेला आहे आणि महाविकास आघाडीचे इतर दोन घटक पक्ष जर धरले तर जवळपास २६५१ ग्रामपंचायतींमध्ये महाविकास आघाडीचा झेंडा फडकलेला आहे.”

याशिवाय, “शिवसेना(शिंदे गट) आणि भाजपा यांचा मिळून साधारणपणे २२०० ते २३०० ग्रामपंचायतींवर झेंडा फडकेलाल आहे. त्यामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीला मोठ्याप्रमाणात ग्रामीण भागातील जनतेने साथ दिलेली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दत्तक घेतलेल्या फेटरी गावातही राष्ट्रवादीचा झेंडा फडकलेला आहे. त्यामुळे हे लक्षात येतं की दलबदलुंचं राजकारण महाराष्ट्र मान्य करत नाही. साम-दाम-दंड भेद वापरून, सत्ता वापरून, सत्तेचा दुरपयोग करूनही आज महाविकास आघाडीचा पराभव हा भाजपा आणि त्यांच्याबरोबरचा शिंदे गट करू शकत नाही. हे पुन्हा एकदा महाराष्ट्रात सिद्ध झालेलं आहे.”असंही जयंत पाटील म्हणाले आहेत.



### आणखी ग्रामपंचायतींचे निकाल यायचे आहेत.

याचबरोबर, “आणखी ग्रामपंचायतींचे निकाल यायचे आहेत. मला खात्री आहे की महाविकास आघाडी आणि भाजपा व शिंदे गटामधील अंतर वाढेल. पुन्हा एकदा महाराष्ट्रातील जनतेने महाविकास आघाडीला प्राधान्य दिलेलं आहे. महाराष्ट्रातील जनतेचं मी मनपूर्वक आभार मानतो. महाराष्ट्रातील जनतेने भाजपा आणि शिंदे गटाचा पराभव केलेला आहे, हे या आकडेवारीवरून सिद्ध होतं. सर्व जागांचे निकाल जाहीर होण्या अगोदरच त्यांनी एकमेकांना लाडू भरवले आहेत. आम्ही सगळे निकाल जाहीर होण्याची वाट बघणार आहोत. उद्या सर्व निकाल हाती आल्यावर मी अधिकृत आकडेवारी आपल्यासमोर मांडणार आहे.

### सांगली: ११० ग्रामपंचायतींवर राष्ट्रवादीची सत्ता

**सांगली:** जिल्ह्यात रविवारी पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसने सर्वाधिक ११० गावात वर्चस्व सिध्द केले आहे. त्यापाठोपाठ भाजपाने ९५ ग्रामपंचायतीमध्ये सत्ता संपादन केली आहे.मंगळवारी ग्रामपंचायत निवडणुकीची मतमोजणी करण्यात आली. सायंकाळी मिळालेल्या माहितीनुसार या निवडणुकीत कॉंग्रेसला ५० ग्रामपंचायतीमध्ये सत्ता मिळाली असून यापैकी बहुंताशी ग्रामपंचायती पलूस-कडेगाव विधानसभा मतदार संघातील आहेत. बाळासाहेबांची शिवसेना पक्षाने आ. अनिल बाबर यांच्या नेतृत्वाखाली खानापूर-आटपाडी मतदार संघामध्ये ३२ ग्रामपंचायती जिंकल्या, तर उ.बा. ठाकरे शिवसेनेने ८ ठिकाणी विजय मिळवला. स्थानिक आघाड्यांनी ९० ग्रामपंचायतीत

## शॉर्ट न्यूज

### निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये असंतोष उफाळला



।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

कर्नाटकमध्ये भाजपची सत्ता असून २०२३मध्ये येथे विधानसभेच्या निवडणुका पार पडतील. या निवडणुकीपूर्वी भाजपची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. कारण दोन बड्या नेत्यांनी हिवाळी अधिवेशनाला दांडी मारुन नराजी प्रकट केली आहे.

कर्नाटक सरकारमधील माजी मंत्री के.एस. ईश्वरप्पा आणि रमेश जरकीहोली यांनी विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनापासून दूर राहाणं पसंद केलं आहे. ज्येष्ठ नेते ईश्वरप्पा यांनी मंत्रिमंडळामध्ये पुन्हा समावेश करण्याची मागणी केली आहे.

# किसान संघाचा 'जीएसटी' विरोधात मोर्चा!

## उत्पादन खर्चावर आधारित दरांची मागणी

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।

कृषी अवजारे, साहित्यावर आकारला जाणारा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्न असलेल्या भारतीय किसान संघाच्या नेतृत्वाखाली सोमवारी दिल्लीत मोर्चा काढण्यात आला. यात हजारो शेतकरी सहभागी झाले होते. यासह अन्य मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

या मोर्चात पंजाब, महाराष्ट्र, तेलंगण, आंध्र प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगालसह अन्य राज्यांतील शेतकरी थंडीची पर्वा न करता




सहभागी झाले होते. किसान गर्जना नावाच्या या आंदोलनात अनेक शेतकरी मोटार सायकल, ट्रॅक्टर, खासगी वाहनांसह सहभागी झाले. रामलीला मैदानावर हे आंदोलन झाल्याचे आयोजकांनी सांगितले. पंतप्रधान शेतकरी योजनेतील अर्थसाह्यात वाढ, जीएम वाणांसाठी दिलेली परवानगी रद्द करणे आणि उत्पादन खर्चावर आधारित भाव आदी मागण्याही या शेतकऱ्यांनी केल्या आहेत.

> पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या हक्कांविषयी दिलेली आश्वासने पोकळ ठरल्याचे दिसत आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याचे आश्वासन दिले होते, पण ते प्रत्यक्षात आले नाही. शेतकरी हे भिकारी नाहीत. त्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे.
> – मोहिनी मोहन, राष्ट्रीय सरचिटणीस, भारतीय किसान संघ

या मोर्चात पंजाब, महाराष्ट्र, तेलंगण, आंध्र प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगालसह अन्य राज्यांतील शेतकरी थंडीची पर्वा न करता सहभागी झाले होते. किसान गर्जना नावाच्या या आंदोलनात अनेक शेतकरी मोटार सायकल, ट्रॅक्टर, खासगी वाहनांसह सहभागी झाले. रामलीला मैदानावर हे आंदोलन झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

# राज्यस्थानमध्ये 500 रुपयांत मिळणार गॅस सिलिंडर, मुख्यमंत्र्यांची घोषणा

।मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

वाढत्या महागाईमुळे आधीच सामान्य जनता त्रस्त आहे, यात घरगुती गॅस सिलिंडरच्या वाढत्या किंमतींमुळे आता खायचं कसं असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांना भेडसावड आहे. अशातच राज्यस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी नागरिकांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजस्थानचे मुख्यमंत्री गहलोत यांनी घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात मोठी कपात केली आहे.

यामुळे राजस्थानमध्ये अवघ्या 500 रुपयांना आता गॅस सिलिंडर मिळणार आहे. राजस्थान सरकारने दारिद्र्यरेषेखालील (BPL) आणि उज्वला योजनेत नाव नोंदवलेल्या नागरिकांना 500 रुपयांत एलपीजी सिलिंडर (LPG Gas Cylinder) देणार असल्याची घोषणा राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी केली आहे.यानुसार, दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना वर्षभरात 12 सिलिंडर मिळणार आहेत. यासोबत नागरिकांना



'रसोई किट'मध्ये स्वयंपाकघरातील सामान देण्यात येईल असंही गेहलोत यांनी जाहीर केली, यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी उपस्थित होते. राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत यांनी घोषणा करत म्हटले की, ही नवीन योजना 1 एप्रिल 2023 पासून लागू केली जाईल. राज्यस्थानच्या जनतेला महागाईच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी हा प्रयत्न आहे. यासाठी सरकारने नवीन योजना सुरु केली आहे. या नव्या योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील (BPL) आणि उज्वला योजनेतील नागरिकांना अवघ्या 500 रुपयांत गॅस सिलिंडर मिळणार आहे. या योजनेत वर्षाला 12 सिलिंडर दिले जातील, यात गरीब आणि गरजू लोकांना सामावून घेत अधिक लाभ देणं हे सरकारचं लक्ष्य आहे. अशोक गेहलोत यांनी याबाबत एक ट्विट देखील केले आहे. ज्या ट्विटमध्ये त्यांनी म्हटले की, 'राज्य सरकार गरिबांना जास्तीत जास्त दिलासा देण्यासाठी सातत्याने लोककल्याणकारी निर्णय घेत आहे. यासाठी राज्य सरकार गरिबांना स्वस्त दरात सिलेंडर देण्याची योजना आणणार आहे.

सध्या देशाची आर्थिक राजधानी मुंबईत 14.2 किलो एलपीजी गॅस सिलिंडर 1052.50 रुपये किमतीला मिळतोय. तर दिल्लीत 14.2 किलो घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरची किंमत 1053 रुपयांना आहे. याशिवाय कोलकातामध्ये 1079 रुपये तर, चेन्नईत 1068.50 रुपयांना विकला जात आहे.

# चीनच्या घुसखोरीवर संसदेत भाजप-काँग्रेसमध्ये जुंपली

## चर्चेची मागणी केंद्र सरकारने फेटाळली, काँग्रेसचा

।बंगळुरू। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमध्ये चीनने केलेल्या घुसखोरीच्या मुद्यावर सोमवारी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी भाजप आणि काँग्रेसच्या खासदारांमध्ये चांगलीच जुंपली. चीनच्या घुसखोरीच्या मुद्यावर राज्यसभेत चर्चा करण्याची मागणी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह विरोधकांनी केली. तशी नोटीसही दिली, परंतु ही मागणी फेटाळल्याने काँग्रेसने आक्रमक होत सभात्याग केला. चीन आमच्या जमिनीवर कब्जा करीत आहे. चीनच्या घुसखोरीवर चर्चा नाही करायची तर आणखी कशावर चर्चा करणार, असा सवाल करीत मल्लिकार्जुन खर्गे संतप्त झाले.

मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, सरकार चीनच्या घुसखोरीसंदर्भात



काय करत आहे हे त्यांनी सांगावे. आमचे नेते राहुल गांधी जेव्हा सरकारच्या भूमिकेबद्दल बोलले, तेव्हा उलट भाजपने आमच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आपल्या सीमेवर काय चालले आहे याकडे सर्वांचे लक्ष आहे. तिथे समस्या मोठी आहे. पंतप्रधान मोदी चीनच्या राष्ट्राध्यक्षांसोबत झुल्यावर बसून खेळत होते हे सर्वांनी बघितले असेल. चीन आक्रमक झाला आहे. तो युद्धाच्या तयारीत आहे. आम्हाला चीनच्या मुद्यावर चर्चा करायची आहे, पण सरकार चर्चेसाठी तयार नाही. सरकारचे प्रतिनिधी बाहेर सिंहासारखे बोलतात, पण प्रत्यक्षात उंदरासारखे वागत असल्याचेही खर्गे म्हणाले.

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनीही भाजपवर निशाणा साधला. ते म्हणाले की, चीनने भारताच्या २ हजार चौ. मीटर भूभागाचा ताबा घेतला आहे. चीन भारतासोबत युद्ध करण्याच्या तयारीत आहे. भाजप सरकार हे झोपेत आहे. राहुल गांधी यांच्या या टीकेला केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी उत्तर दिले आहे. ते म्हणाले की, यूपीएची सत्ता असताना अशा संवेदनशील मुद्यांवर कधीच चर्चा झाली नाही. आपले सैन्य सीमेवर खंबीरपणे उभे आहे. राहुल गांधी असे वक्तव्य करून सैन्याचे खच्चीकरण करीत आहेत. काँग्रेस पक्ष या मुद्याचे राजकारण करीत आहे.

चीनच्या कथित बांधकामावर चर्चा करण्यासाठी काँग्रेस नेते प्रमोद तिवारी यांनी संसेद नोटीस दिली होती. ती नोटीस फेटाळण्यात आली. त्यामुळे विरोधक आक्रमक झाले. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी चीनच्या मुद्यावर चर्चा करण्याची मागणी केली. चीनच्या घुसखोरीवर चर्चा नाही करणार तर आणखी कशावर चर्चा करणार, असा सवाल त्यांनी केला.

# मला संतोष जुवेकरच हवा आहे..



झेंडा, मोरया, एक तारा आणि यासारखे कितीतरी चित्रपट गाजवलेला उत्तम अभिनेता म्हणजे संतोष जुवेकर. तो सोशल मिडियावरही बराच सक्रिय असतो. त्याचा चाहता वर्ग मोठा आहे. संतोष अभिनया सोबत सामाजिक कामातही बराच सक्रिय असतो. काही दिवसांपूर्वीच त्याचा '36 गुण' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात तो अत्यंत वेगळ्या भूमिकेत दिसला. आता मात्र त्याने मोठी घोडदौड घेतली आहे. लवकरच तो बॉलीवुड मध्ये झळकणार आहे. याच चित्रपटाबद्दल त्याने एक किस्सा आज शेयर केला आहे. संतोष लवकरच 'कुत्ते' या हिंदी चित्रपटात झळकणार आहे. याच चित्रपटाचा टीजर शेयर करत त्याने एक पोस्ट लिहिली आहे. तो म्हणतो 'मित्रांनो १३ जानेवारीला एक अजून धमाका.. "कुत्ते".. खूप स्वप्नं आहेत, त्यातील एक अजून स्वप्न सत्यात उतरलं, विशाल भारद्वाज ह्यांच्या प्रोडक्शन मधे आणि त्यांच्या सिनेमात काम करण्याचं भाग्य मला मिळालं.. आणि तेही ऑडिशन न देता डायरेक्ट कास्ट केलं मला त्यांनी." पुढे तो म्हणाला, "जेंव्हा मुकेश छाबरा (कास्टिंग डिरेक्टर) सरांच्या ऑफिसमधून कॉल आला २०२१ ला.. तेंव्हा मी विचारलं की, सर ऑडिशन करने स्टुडिओ कब आना हैं?" त्यावर ते म्हणाले.. "अरे नही विशाल सरने खुद तुम्हारा नाम मेंशन किया है के.. मुझे ये कॅरेक्टर के लीये संतोष जुवेकर ही चाहिये.." आयच्या गावात अजून काय पाहिजे राव.. माझ्या ह्या स्वप्नांं साठी तुमच्या शुभेच्छा तुमची साथ आणि बाप्पाचा आशिर्वाद कायम हवाय...... हक्काने.." अशी पोस्ट त्याने केली आहे.

# प्रसिद्ध ब्रान्ड विरोधात अनुष्का शर्मा

बॉलीवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा भडकलीय ही बातमी काही क्षणात वाऱ्यासारखी पसलरी अन् जो-तो चर्चा करू लागला. नेहमीच मस्तीच्या मूडमध्ये दिसणारी अनुष्का खूप बिनधास्त आणि रोखठोक आहे. पण तिला असं भडकताना खूप कमी पहायला मिळालं आहे. आता एका ब्रान्डनं अशी काही हरकत केलीय ज्यानं अभिनेत्रीचा पारा चढला. आणि अनुष्कानं यासाठी ब्रान्डला तिखट भाषेत सुनावलं आहे.

झालं असं की प्रसिद्ध ब्रान्ड पूमाने अनुष्का शर्माचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोमध्ये अभिनेत्रीनं पूमाचे टॉप, को-ऑर्ड सेट आणि जॅकेट घातलं आहे. या फोटोंना शेअर करत या ब्रान्डने सेलिब्रिटी देखील कसे आपला ब्रान्ड वापरतात यासंदर्भात नेटकऱ्यांशी भाष्य केले. पण आपल्या फोटोंना कंपनीनं प्रमोशन साठी वापरणं अनुष्का शर्माला मुळीच आवडलं नाही. कारण यासाठी तिची परवानगी घेण्यात आली नव्हती.

अनुष्काच ती..डोकं फिरल्यावर लागलीच तिनं आपल्या इन्स्टा स्टोरीत पूमा कंपनीची ती प्रमोशनवाली पोस्ट शेअर करत लिहिलं की," हॅलो पूमा इंडिया. मला वाटतं की तुम्हाला कदाचित ही गोष्ट चांगलीच माहित असेल की माझ्या परवानगी शिवाय तुम्ही माझे फोटो तुमच्या प्रमोशनसाठी वापरू नाही शकत. कारण मी तुमची ब्रान्ड





# फिफा'च काय कान्स मध्येही दीपिकाने घुरळा उडवला

सगळ्यांचे लक्ष अनेक दिवसांपासून वेधून असलेला फिफा विश्वचषक 2022 फूटबॉल अंतिम सामाना काल कतारच्या लुआस स्टेडियमवर अर्जेंटिना आणि फ्रान्स यांच्यात रंगला. या सामन्यात अर्जेंटिनाने बाजी मारली. यावेळी अभिनेत्रीने दीपिका पदुकोणने फिफा विश्वचषक 2022 ची ट्रॉफी लाँच करून भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. यावेळी दीपिकाचा लुक, तिची फॅशन तिचे कर्तृत्व या साऱ्याचीच बक्कळ चर्चा झाली. पण दीपिकाला मिळालेला हा काही पहिलाच बहुमान नव्हता. याआधीही जगातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या कान्स फिल्म फेस्टिवलमध्ये दीपिकाने आपली जादू दाखवली होती. त्याचीच ही गोष्ट.. यंदाच्या 'कान्स' मध्ये भारतातून मनोरंजन विश्वातील अनेक कलाकारांचा मोठा ताफा गेला होता. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकुर यांच्यासह तापसी पन्नु, नवाझुद्दीन सिद्धिकी, दीपिका पदुकोण, नयनतारा, आर माधवन यांच्या नावाचा समावेश आहे. पण त्यात विशेष ठरली. कारण दीपिका यंदाच्या कान्समध्ये परिक्षकाच्या भूमिकेत होती. कान्समध्ये तिच्या लुकची, कपड्यांची साऱ्याचीच चर्चा झाली. पण दीपिका हिट ठरली ते तिच्या भाषणामुळे.. तिच्या भाषणामुळे सारेच अवाक झाले. यावेळी दीपिका म्हणाली होती, 'कान्ससारख्या जागतिक चित्रपट महोत्सवामध्ये भारताला मिळालेला गौरवाचं स्थान समस्त भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. कान्सला देखील 75 वर्षे पूर्ण झाली आहेत.

# अमृता पत्कीच्या नृत्याचा जलवा!



अभिनेत्री अमृता पत्की हिने ग्लॅमर विश्वात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. २००६च्या 'मिस इंडिया' या सौंदर्य स्पर्धेपर्यंत यशस्वी ठरल्यानंतर अमृताने आंतरराष्ट्रीय पातळीवरही 'मिस अर्थ' स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आणि तिथेही 'मिस अर्थ एअर'चा किताब मिळवला होता. अमृताने २०१०मध्ये बॉलिवूडमध्ये पदार्पण केले, त्यानंतर काही मराठी चित्रपटांमध्ये ती झळकली होती. मराठी-हिंदी चित्रपटांमध्ये झळकलेली ही गुणी अभिनेत्री आता बऱ्याच कालावधीनंतर 'सुर्या' या चित्रपटातून मराठी रुपेरी पडद्यावर दिसणार आहे. सध्या मराठी चित्रपटात बॉलीवूड तारका आयटम साँगवर थिरकताना दिसतायेत. या यादीत अमृताचाही समावेश झाला आहे. अमृता पत्की हिच्या नृत्याचा जलवा 'सुर्या' या आगामी मराठी चित्रपटात पहायला मिळणार आहे.

'रापचिक रापचिक कोळीणबाई' असे बोल असणाऱ्या या गाण्यात अमृताचा नखरेल अंदाज पहायला मिळणार आहे. नृत्यदिग्दर्शक उमेश जाधव यांनी या गाण्याचे नृत्यदिग्दर्शन केले आहे. संतोष दरेकर, मंगेश ठाणगे, देव चौहान यांनी लिहिलेल्या गाण्याला देव चौहान यांचे संगीत लाभले आहे. ममता शर्मा आणि देव चौहान यांनी आपल्या दमदार आवाजात हे गाणं गायलं आहे. राजेंद्र ठाकरे आणि आकाश गोयल प्रस्तुत एस. पी. मोशन पिक्चर्सच्या 'सुर्या' हा ॲक्शनपॅक्ड चित्रपट ६ जानेवारीला संपूर्ण महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार आहे.

# इंग्लडने 'घर मे घुसके मारा'!

## 3-0 ने पाकिस्तानचा कसोटी मालिकेत लाजिरवाणा पराभव

**। इंग्लंड ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



इंग्लंडने मंगळवारी येथे झालेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या कसोटी क्रिकेट सामन्यात पाकिस्तानचा आठ गडी राखून पराभव करत तीन सामन्यांच्या मालिकेत ३-० असे निर्भेळ यश संपादन केले. . इंग्लंडने सकाळी डाव सुरू केला तेव्हा त्यांना विजयासाठी फक्त ५५ धावांची गरज होती. त्याने ३८ मिनिटांत २ बाद १७० अशी धावसंख्या करून ऐतिहासिक विजयाची नोंद केली.

घरच्या मैदानावर तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत पाकिस्तानला ३-० असा पराभव पत्करावा लागण्याची ही पहिलीच वेळ आहे. इंग्लंडच्या १८ वर्षीय रेहान अहमदने (५/४८) शानदार गोलंदाजी केल्यामुळे पाकिस्तानचा डाव २१६ धावांत आटोपला आणि इंग्लंडने विजयासाठी १६७ धावांचे लक्ष्य ठेवले. त्यानंतर बेन डकेटने ५० धावा केल्या आणि ७८ चेंडूत ८२ धावा करून नाबाद राहिला.

त्याच्यासोबत कर्णधार बेन स्टोक्स ३५ धावांवर नाबाद राहिला. अशाप्रकारे इंग्लंडने एका दिवसापेक्षा जास्त दिवस शिल्लक असताना सलग दुसरा कसोटी सामना जिंकला.पाकिस्तानचा फिरकी गोलंदाज अबरार अहमदने दोन कसोटीत १८ विकेट्स घेतल्या होत्या पण जेव्हा इंग्लंडचे लक्ष्य १९ धावांनी कमी होते तेव्हा आगा सलमानने स्टोक्सला त्याच्या चेंडूवर बाद केले. इंग्लंडने रावळपिंडी येथे पहिल्या कसोटीत ७४ धावांनी विजय मिळवला होता, तर मुलतानमधील दुसरी कसोटी २४ धावांनी जिंकून अभेद्य आघाडी घेतली होती.

नॅशनल स्टेडियम हा पाकिस्तानचा बालेकिल्ला मानला जातो पण रेहान बटने तिसऱ्या दिवशी दमदार गोलंदाजी केली तर जॉक क्रॉलीने (४१) डकेटने धडाकेबाज सुरुवात केली आणि तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा इंग्लंडने २ बाद ११२ धावांपर्यंत मजल मारली. याच स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या ४५ कसोटी सामन्यांमधला हा पाकिस्तानचा तिसरा पराभव होता आणि गेल्या १५ वर्षांतील पहिला पराभव होता. २००० मध्ये येथे कसोटी सामन्यात पाकिस्तानला पराभूत करणारा इंग्लंड हा पहिला संघ होता. नॅशनल स्टेडियमवर सात वर्षांनंतर दक्षिण आफ्रिकेने विजय मिळवला. पाकिस्तानने घरच्या भूमीवर सलग चौथा कसोटी सामना गमावला. तत्पूर्वी, दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने त्यांचा पराभव करत मालिका १-० अशी जिंकली होती.

पाकिस्तानने पहिल्या डावात ३०४ धावा केल्या होत्या, त्याला प्रत्युत्तरात इंग्लंडने ३५४ धावा केल्या आणि पहिल्या डावात ५० धावांची आघाडी घेतली.

# पाकिस्तान क्रिकेटमध्ये भूकंप होण्याची शक्यता!

## बाबर आझम आणि रमीज राजा यांच्यावर टांगती तलवार

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाबाबत काही मोठे निर्णय घेतले जाऊ शकतात. यापूर्वी बोर्डाच्या अध्यक्षांनी बीसीसीआयवर ज्या प्रकारे निशाणा शेअर केला आहे. पुढच्या वर्षी भारतात होणाऱ्या आयसीसी एकदिवसीय विश्वचषकासाठी पाकिस्तानने संघ पाठवू नये, असा त्यांनी उघडपणे पुनरुच्चार केल्याने ते त्यांच्यासाठी घातक ठरू शकते. या बातमीवर विश्वास ठेवला तर येत्या काही दिवसांत पाकिस्तान क्रिकेटमध्ये भूकंप होणार आहे.

पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत बाबर आझमच्या नेतृत्वाखालील संघाची अवस्था वाईट आहे. इंग्लंडने तीनही कसोटी सामने जिंकत पाकिस्तानविरुद्ध निर्भेळ यश संपादन केले. अशा परिस्थितीत पराभवानंतर बाबर आझमचे कसोटीचे कर्णधार जाऊ शकते. बाबरच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानचा हा सलग दुसरा मालिका पराभव आहे.





# दुसऱ्या कसोटीपूर्वी भारताला मोठा धक्का!

## हा दिग्गज खेळाडू मालिकेतून बाहेर

**कतार ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

भारत आणि बांगलादेश यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पुढील सामना 22 डिसेंबरपासून मीरपूर येथे खेळल्या जाणार आहे. या सामन्यापूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. खरं तर संघाचा नियमित कर्णधार रोहित शर्मा बोटाला झालेल्या दुखापतीमुळे दुसऱ्या कसोटी सामन्यातूनही बाहेर पडला आहे.



**बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात रोहित शर्मा उपलब्ध नसणार आहे. रोहित संघात सामील होईल अशी अपेक्षा होती पण आता तो दुखापतीतून पूर्णपणे सावरला नसल्याची बातमी समोर येत आहे. भारताच्या आगामी मालिकेतील महत्त्वाचे सामने पाहता बीसीसीआय आणि निवड समितीला कोणताही धोका** पत्करायचा नाही.

क्रिकबझच्या वृत्तानुसार बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात रोहित शर्मा उपलब्ध नसणार आहे. रोहित संघात सामील होईल अशी अपेक्षा होती पण आता तो दुखापतीतून पूर्णपणे सावरला नसल्याची बातमी समोर येत आहे. भारताच्या आगामी मालिकेतील महत्त्वाचे सामने पाहता बीसीसीआय आणि निवड समितीला कोणताही धोका पत्करायचा नाही.

वृत्तानुसार, रोहित शर्मा फलंदाजी करण्यास पूर्णपणे सक्षम आहे परंतु क्षेत्ररक्षणाबाबत थोडा चिंतेत आहे. अशा परिस्थितीत रोहित शर्मा आता जानेवारीत श्रीलंकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे आणि टी-20 मालिकेत टीम इंडियात पुनरागमन करताना दिसणार आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यातील आगामी मालिका 3 जानेवारीपासून सुरू होणार आहे.

भारत आणि बांगलादेश यांच्यातील 2 कसोटी मालिकेतील पहिला कसोटी सामना चितगाव येथे खेळल्या गेला. या सामन्यात टीम इंडियाने यजमान बांगलादेशचा 188 धावांनी पराभव केला. भारताकडून या कसोटी सामन्यात चेतेश्वर पुजारा आणि शुभमन गिल यांनीही शतकी खेळी खेळली केली. टीम इंडियाच्या विजयासह भारताने या कसोटी मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

# फायनल अर्जेंटिना अन् फ्रान्सची दंगल केरळमध्ये, एकाचा मृत्यू

## केरळच्या कन्नूरमध्ये फ्रान्स-अर्जेंटिनाच्या समर्थकांमध्ये हाणामारी

**। केरळ ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत गतविजेत्या फ्रान्सचा पराभव करून अर्जेंटिनाने ट्रॉफी आपल्या नावे केली. या रोमहर्षक सामन्यात अनेक टर्निंग पॉइंट्स आले. कधी अर्जेंटिनाचा संघ सहज जिंकेल असे वाटत होते तर कधी फ्रान्सने माघारी येऊन टेबल फिरवले. अशा परिस्थितीत अतिरिक्त वेळेनंतर सामना 3-3 असा बरोबरीत सुटला आणि पेनल्टी शूटआऊटपर्यंत पोहोचला. यामध्ये अर्जेंटिनाने 4-2 असा विजय मिळवत तिसऱ्यांदा विश्वचषक जिंकला.

या विजयाचा संपूर्ण जगात जल्लोष करण्यात आला. भारतातील लोकांनीही या सामन्याचा आनंद लुटला. सामना संपल्यानंतर अर्जेंटिना आणि मेस्सीच्या चाहत्यांनीही विजय साजरा केला. अर्जेंटिनाच्या विजयाचा विशेषत: केरळमध्ये जल्लोष करण्यात आला.



मात्र या काळात हिंसक घटनाही समोर आल्या आहेत. केरळच्या कन्नूरमध्ये फ्रान्स आणि अर्जेंटिनाच्या समर्थकांमध्ये हाणामारी झाली. यामध्ये तीन जण जखमी झाले. त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना पलियामूलाजवळ घडली. अर्जेंटिनाच्या चाहत्यांनी फ्रेंच चाहत्यांना टोमणे मारले, त्यानंतर हिंसाचार झाला. सहा जणांना ताब्यात घेतले असून लवकरच त्यांच्या अटकेचीही नोंद करण्यात येणार आहे. याशिवाय कोची आणि तिरुअनंतपुरममध्येही हिंसाचाराच्या काही घटना घडल्या आहेत. अर्जेंटिनाच्या विजयानंतर आनंद साजरा करणाऱ्या लोकांना हाताळताना दोन पोलिस अधिकाऱ्यांवर हल्ला करण्यात आला.स्थानिक स्टेडियममधून अर्जेंटिनाच्या चाहत्यांच्या विजयी मिरवणुकीत अक्षय कुमार या १७ वर्षीय किशोरचा मृत्यू झाला. अर्जेंटिनाने 1978 आणि 1986 नंतर तब्बल 36 वर्षांनी फिफा विश्वचषक जिंकला आहे.